# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/वृ.प्रा/ ३० /२०२१-२२ दिनांक :- १३/०७/२०२२

प्रति,
सिस्टम मॅनेजर,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

विषय:- संकेतस्थळावर जाहीर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामातील बाधीत होणारी / धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामाची सोबत जोडलेली जाहीर नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहीर नोटीस प्रत.

(योगेश गुणिजन)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३


जा.क्र.मनपा/वृ.प्रा / 30 /2021-22

दिनांक :- 13 /04/2022

### // जाहिर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधीत होणारी/धोकादायक झाडे मुळासहित काढणे व पुर्न:रोपन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| 1. | सदरचे झाड भाईंदर (प.) उत्तन भाटेबंदर लाईट हाऊस रोड येथील अर्जदार यांच्या घराच्या बाजुला वाढलेले असून झाडांचा बुंधा घराच्या भिंतीला लागून असल्याने भिंतीला तडे गेलेले आहे. जोराच्या वाऱ्याने झाड व घराची भिंत पडून जिवीत हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदर 01 नग बदामाचे झाड मुळासकट काढणे आवश्यक आहे. **(श्रीम.प्रमिला डिक्सन पटकीट यांचे दि.10/02/2022** रोजीचे पत्र.) | 01 नग बदाम |
| 2. | सदरचे झाड भाईंदर (प.) मोर्वा येथे अर्जदार यांच्या श्रीगणेश निवास घरासमोर उंच वाढलेले असून सदर झाडांचे नारळ व सुकलेल्या झावळया पडून नागरीकांच्या जिवाला धोका आहे. या कारणास्तव सदर 01 नग नारळाचे झाड मुळासकट काढणे आवश्यक आहे. **(डॉ.जयप्रकाश गोविंद पाटील यांचे दि.22/02/2022** रोजीचे पत्र.) | 01 नग नारळ |
| 3. | सदरचे झाड भाईंदर (प.) महानगरपालिका मुख्यालयाच्या उदयानात वाढलेले असून सदर झाड शेजारी असलेल्या दुकानाच्या दिशेने झुकलेले आहे. तसेच झाडाचे नारळ व सुकलेल्या झावळया वारंवार पडून ग्राहकांना तसेच दुकान मालकांना इजा झालेल्या आहेत. या कारणास्तव सदर 01 नग नारळाचे झाड मुळासकट काढणे आवश्यक आहे. **(कदम ॲंड ब्रदर्स पतंजली शॉप यांचे दि.23/02/2022** रोजीचे पत्र.) | 01 नग नारळ |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उदयान), उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग, पहिला मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

(योगेश गुणिजन)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका